प्रेसनोट दि.२९.०१.२०२०

शिर्षक :- श्री. प्रविण सुभाष सवासे, वय ४२ वर्ष, पशुधन विकास अधिकारी पशु वैद्यकीय दवाखाना सलगरे, अति. कार्यभार पशु विकास अधिकारी(विस्तार) पशुसंवर्धन विभाग, पंचायत समिती, मिरज, जि.सांगली, वर्ग- १ यांनी ८०००/- रुपये लाच रक्कम स्विकारले नंतर रंगेहात पकडले. सांगली लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | पुणे परिक्षेत्र, सांगली युनिट |
| गुन्हा नोंद क्रमांक | महात्मा गांधी चौक पोलीस स्टेशन, गुरनं २२/२०२० |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा १९८८ चे कलम ७ प्रमाणे |
| अरोपीचे नाव व कार्यालय | प्रविण सुभाष सवासे, वय ४२ वर्ष, पशुधन विकास अधिकारी पशु वैद्यकीय दवाखाना सलगरे, अति. कार्यभार पशु विकास अधिकारी(विस्तार) पशुसंवर्धन विभाग, पंचायत समिती, मिरज, जि.सांगली, वर्ग- १ |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ८०००/- रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ८०००/- रुपये |
| थोडक्यात माहिती | तक्रारदार यांनी जुलै २०१९ मध्ये शासनाच्या विशेष घटक योजनेअंतर्गत शेळी गट या योजनेसाठी पं.स. मिरज येथे अर्ज् केला होता. तक्रारदार यांचा अर्ज मंजुर झाला असुन सदर मंजुर अर्जावरुन तक्रारदार यांना अनुदानाची रक्कम मंजुर करुन देण्याकरीता डॉ. श्री. सवासे यांनी तक्रारदार यांचेकडे १२,०००/- रुपयांची लाच मागणी केली असल्याबाबत तक्रारदार यांनी दि. २७.०१.२०२० रोजी तक्रारी अर्ज दिला होता.तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार दि. २८.०१.२०२० रोजी ब्युरोच्या कार्यप्रणालीप्रमाणे पडताळणी केली असता पडताळणीमध्ये लोकसेवक श्री. सवासे, पशुधन विकास अधिकारी यांनी तक्रारदार यांचेकडे प्रथम १०,०००/- रुपये व चर्चेअंती ८,०००/-रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.<br>त्यानंतर लागलीच लोकसेवक श्री. सवासे, पशुधन विकास अधिकारी यांचे विरुध्द पंचायत समिती कार्यालय, मिरज येथे सापळा लावला असता श्री प्रविण सुभाष सवासे, पशुधन विकास अधिकारी पंचायत समिती, मिरज, वर्ग- १ यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करुन तक्रारदार यांचेकडुन ८,०००/- रुपये लाच रक्कम स्विकारले असता त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.<br>लोकसेवक श्री. प्रविण सुभाष सवासे, वय ४२ वर्ष, पशुधन विकास अधिकारी पशु वैद्यकीय दवाखाना सलगरे, अति. कार्यभार पशु विकास अधिकारी(विस्तार) पशुसंवर्धन विभाग, पंचायत समिती, मिरज, जि.सांगली, वर्ग- १ यांचे विरुध्द महात्मा गांधी चौक पोलीस स्टेशन येथे लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमाखाली लाच मागणिचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबेंधीत काही माहिती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास त्वरित लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,म.रा.शी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :- पोलीस उपअधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, बदाम चौक, सांगली ,४१६४१६
संकेत स्थळ :- **acbmaharashtra.gov.in**
ई-मेल :- **acbwebmail@mahapolice.gov.in**
ऑनलाईन तक्रार ॲप :- **acbmaharashtra.net**
टोल फ्री क्रमांक :- १०६४
दुरध्वनी क्रमांक :- ०२३३,२३७३०९५ व्हॉट्सॲप क्रमांक :- ७३५००८७२६६, ९८२३२२५४६५

(प्रशांत चौगुले)
पोलीस निरीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो, सांगली.